दैनिक
# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे संपादक : बंडूभाऊ इंगोले

RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : २८७ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदांचे आरक्षण जाहीर

## ▶▶ १५ महानगरपालिकांमध्ये महिला होणार महापौर


**मुंबई, प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाची आरक्षणाची सोडत नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली.

पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून २९ महापालिकांपैकी १५ महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकच पद आरक्षित होत आहे. नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी पद देय होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ पदे आरक्षित झाली असून, त्यापैकी २ पदे अनुसूचित जाती (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी ८ पदे आरक्षित झालेली असून, त्यापैकी ४ पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत.

उर्वरित १७ महानगरपालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी ९ पदे येत असून, ८ पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आहेत.



**महापौर पदासाठी आरक्षण**

अनुसूचित जमातीसाठी राखीव महापालिका – कल्याण-डोंबिवली

अनुसचित जातीसाठी राखीव महापालिका - ठाणे (सर्वसाधारण), जालना (महिला), लातूर (महिला).

नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला आरक्षण) - जळगाव, चंद्रपूर, अहिल्यानगर, अकोला.

नागरिकांचा मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) – पनवेल, इचलकरंजी, कोल्हापूर, उल्हासनगर.

सर्वसाधारण महिला आरक्षण – पुणे, धुळे, बृहन्मुंबई, नवी मुंबई, नांदेड-वाघाळा, मालेगाव, मीरा-भाईंदर, नागपूर, नाशिक.

सर्वसाधारण प्रवर्ग - छत्रपती संभाजीनगर, परभणी, सांगली-मिरज-कुपवाड, अमरावती, वसई-विरार, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, भिवंडी-निजामपूर.

## () थोडक्यात ()

### नाशिककरांवरील करवाढ 'स्थायी' अभावी टळली



**नाशिक :** कुठलीही कर व दरवाढ करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. करवाढीचा प्रस्ताव स्थायी समितीवर २८ फेब्रुवारीपूर्वी मंजूर होणे बंधनकारक आहे. मात्र, सध्या महापालिकेची निवडणूक झाली असली तरी महापौर निवड आणि त्यानंतर स्थायी समितीच्या गठणात फेब्रुवारीचा महिना जाणार असल्याने महापालिकेचे २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक आयुक्तांकडून थेट महासभेला सादर केले जाण्याची शक्यता आहे.

### दोन लाख 34 हजार 400 रुपयांची फसवणूक

**नवीन पनवेल :** जुन्या मशीन पावडर कोटिंग करून देतो असे सांगून दोन लाख 34 हजार रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारून नवीन आणि कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी प्रशोध पाणीकर आणि यामिनी पाणीकर (राहणार एनआरआय कॉम्प्लेक्स,सिवूड) यांच्या विरोधात 20 जानेवारी रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अल्ताफ पठाण हे खारघर सेक्टर 40 येथे राहत असून ते नवीन जिमच्या साहित्याच्या शोधात होते. प्रशोध पाणीकर यांच्यावर त्यांनी फोनवर बोलणे केले. यावेळी जुन्या पंधरा मशीनपैकी सात मशीन बदलून नवीन देणार आणि उर्वरित आठ मशीन पावडर कोटिंग करून देणार असल्याचे ठरले. यावेळी बिग बॉय फिटनेस नावाची कंपनी असल्याचे खोटे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला आणि दोन लाख 34 हजार 400 रुपये रोखीने आणि ऑनलाईन स्वीकारले. मात्र नवीन मशीन तसेच पावडर कोटिंग केलेल्या मशीन न देता फसवणूक केली.

### पाच वर्षीय मुलाच्या गळ्यातील धाग्यातील सोन्याचे पान चोरले

**नवीन पनवेल वार्ताहर :** पाच वर्षीय मुलगा खेळत असताना त्याच्या गळ्यातील काळा धागा कापून सोन्याचे पान चोरून नेल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात 20 जानेवारी रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुनील डोंबाळे हे कळंबोली, सेक्टर 1 येथे राहत असून त्यांचा पाच वर्षीय मुलगा हा घरासमोर गल्लीत खेळत होता. यावेळी अनोळखी इसमाने त्याच्या गळ्यातील काळा धागा कापला आणि त्यातील साडेचार हजार रुपयांचे सोन्याचे पान चोरून नेले.

# शनिवार वाड्याचा २९४वां वर्धापन दिन

## वर्षातून एकदाच उघडला जातो दिल्ली दरवाजा

**पुणे, प्रतिनिधी :**

मराठा साम्राज्याच्या वैभवाचं प्रतिक असलेला शनिवारवाडा आजही पराक्रम, शौर्य आणि स्वाभिमानाची साक्ष देतोय. शनिवारवाड्याचा प्रत्येक दगड आणि दरवाजा त्याच्या भव्यतेची अनुभूती देतात. उत्तर दिशेला असणारा शनिवारवाड्याचा मुख्य दिल्ली दरवाजाची उंची आणि भक्कमता आजही पर्यटकांना अचंबित करून सोडते. मराठा साम्राज्य आणि पेशवे काळातील इतिहासाच्या पाऊलखुणा आजही शनिवारवाडा आपल्या अंगाखांद्यावर मिरवतोय. इतिहासाचा साक्षीदार बनून अनेक सुखाचे आणि पानिपतच्या तिसऱ्या युद्धासारखे प्रसंग अनुभवणाऱ्या शनिवारवाड्याचा २९४वा वर्धापन दिन थाटात साजरा करण्यात आला.



**वर्षातून एकदाच उघडला जातो दिल्ली दरवाजा :** थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानतर्फे पुणे शहराचं वैभव असलेल्या शनिवारवाड्याचा गुरुवारी २९४वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शनिवारवाड्याचा ऐतिहासिक दिल्ली दरवाजा उघडण्यात आला. विशेष बाब म्हणजे हा दिल्ली दरवाजा वर्षातून एकदाच उघडला जातो. गुरुवारी सर्व मान्यवरांच्या हस्ते दिल्ली दरवाजा उघडण्यात आला. यावेळी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे आणि श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले.

**सातमजली शनिवारवाडा उभारणार :** "छत्रपती शिवाजी महाराज यांना स्मरून बाजीराव पेशवे यांनी याच शनिवारवाड्यापासून अटकेपार झेंडा फडकवला. आज शनिवारवाड्याचा २९४ वा वर्धापन दिन आहे. २०१२ साली मी स्थायी समितीचा अध्यक्ष असताना शनिवारवाडा सातमजली व्हावा यासाठी प्रस्ताव दिला होता. यासाठी माझा पाठपुरावा सुरू असून शनिवारवाड्याच्या ३००व्या वर्धापन दिनापर्यंत सातमजली शनिवारवाडा उभा करणार," असं आमदार हेमंत रासने यांनी सांगितलं.

# लाडक्या बहिणींची पुन्हा झाडाझडती; २२ ते २५ लाख महिलांच्या ई केवायसीची तपासणी होणार

**मुंबई, प्रतिनिधी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील अपात्र महिलांचा शोध घेण्यासाठी पात्र महिलांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यत ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, ई केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडल्याचे निदर्शनाला आले.




त्यामुळे २२ ते २५ लाख महिलांच्या ई केवायसीची अंगणवाडी सेविकांमार्फत पडताळणी करा, असे स्पष्ट आदेश महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याआधी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली.

# माँ.गंगा नर्सिंग कॉलेजचा शपथविधी समारंभ उत्साहात

**वाशिम(प्रतिनिधी) :** स्थानिक मा गंगा नर्सिंग कॉलेजचा प्रथम वर्ष बीएसी नर्सिंग ,जीएनएम ,ए एन एम ,अभ्यासक्रमातील विद्यार्थांचा शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला

स्थानीक मा गंगा नर्सिंग कॉलेज येथील सीताराम कक्ष सभागृहात गुरूवार २२ जानेवारी रोजी पार पडलेल्या कार्यक्रमाला मंचावर स्वंस्थेचे प्रमुख डॉ हरीष बाहेती, डॉ अमित बाहेती ,डॉ अपुर्वा बाहेती डॉ विजय काळे ,सामाजीक कार्यकर्ते





निलेश सोमानी ,प्राचार्य दिपक सिंघल ,उपप्राचार्य अयाज खा पठान उपस्थीत होते.सर्वप्रथम दिप प्रजव्लन करून विद्यर्थांना मानवतेची सेवा करण्याची प्रतीज्ञा देण्यात आली सदर सोहळा फ्लॉरेन्स नाइटटिंगल यांच्या स्मृती पित्यर्थ व नर्सिंगच्या विद्यार्थ्यांच्या व्यवसायिक जीवनाच्या प्रारंभि शपथविधी सोहळा आयोजीत करण्यात येत असतो.यावेळी डॉ हरीष बाहेती,डॉ विजय काळे,डॉ पठान,निलेश सोमानी,डॉ अपुर्वा बाहेती,यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ दिपक सिंघल यांनी केले.कार्यक्रमाला माठ्या प्रमानात विद्यार्थी व पालकांची उपस्थीती होती.

# प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय..!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार

**मुंबई, प्रतिनिधी :** 'सर्वांसाठी न्याय.. जलद न्याय' या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. त्यामुळे न्यायदानाची प्रक्रिया जलद झाली आहे.

न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले. तसेच त्यांनी नियमित आढावा घेत या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची प्रक्रिया



गतिमान केली. संचालनालयाकडील प्रयोगशाळांमध्ये २०२५ मध्ये एक लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच दोन लाख ९४ हजार इतकी प्रकरणे आवक झाली. संचालनालयाने विशेष मोहिम राबवून डिसेंबर २०२५ अखेर तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करून ७९ हजार ५४२ इतकी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत सर्व विभागांच्या प्रचलित मानकांमध्ये वाढ करून संचालनालयातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कामाचे जादा तास वाढवून, शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली.

संचालनालयातील कार्यरत मनुष्यबळाकडून कमीत कमी दोन लाख ते दोन लाख १५ हजार प्रकरणांचा निपटारा करण्याची क्षमता असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी एक लाख ०२ हजार ४१३ इतक्या जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात संचालनालयाला यश आले आहे.

डिसेंबर २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी ' कन्व्हेक्शनल फॉरेन्सीक' या विभागाने तीन लाख ९६ हजार २७५ इतक्या प्रकरणांचा निपटारा केला आहे. तसेच या विभागात २७ हजार ५२४ आवक प्रकरणांची संख्या असून फेब्रुवारी २०२६ पासून ज्याa दिवशी प्रकरण आवक होईल, त्याच दिवशी प्रकरणांचे विश्लेषणाचे काम सुरू होईल,

त्यामुळे दिवसेंदिवस प्रकरण प्रलंबित असण्याची बाब इतिहासजमा होऊन पिडितांना जलदगतीने न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण होत आहे.

# विज्ञान प्रदर्शनात तहसीलदार रंगले; बालवैज्ञानिकांच्या उपकरणांचे कौतुक

**सुभाष खडसे :** विज्ञान प्रदर्शन हे विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना दिशा देणारे प्रभावी व्यासपीठ असून भविष्यातील वैज्ञानिक घडविण्यासाठी विद्यार्थीदशेतच विज्ञान संशोधनाचा पाया भक्कम करणे गरजेचे आहे. शिक्षणात गोडी निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता आहे, असे मत तहसीलदार अभिजित जगताप यांनी व्यक्त केले.

माहूर शहरातील जिनियस इंटरनॅशनल स्कूल येथे आज दिनांक २२ रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन तहसीलदार अभिजित जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सरफराज दोसानी, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे तालुका अध्यक्ष एस. एस. पाटील, सिद्धार्थ तामगाडगे, मुख्याध्यापक संतोष कुमार, उपमुख्याध्यापक हाफिज शेख, आयआयटी फाउंडेशन क्लासचे एमडी सुधीर गौरखेडे, राजाराम गंधेवाड, वैभव मुडांकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना सरफराज दोसानी यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञान उपकरणांच्या निर्मितीतून संशोधन वृत्ती विकसित करावी, निरीक्षण करण्याची सवय लावावी व आत्मविश्वास वाढवावा, असे सांगितले. विद्यार्थीदशेत संशोधनाचे बीज रोवण्यासाठी हे प्रदर्शन दरवर्षी आयोजित केले जाते, असे शाळेचे संस्थापक अध्यक्ष भाग्यवान भवरे यांनी






प्रास्ताविकात नमूद केले.

प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी हायड्रॉलिक ब्रिज, कचरा व्यवस्थापन प्रकल्प, वाहतूक-दळणवळण व्यवस्था, स्वयंचलित ऊर्जा निर्मिती यंत्र, पीठ मळणी यंत्र, नैसर्गिक शेती मॉडेल, पवन ऊर्जा प्रकल्प, जलसंसाधन व्यवस्थापन, ग्रास कटर, रेन डिटेक्टर कॅप, घरगुती वॉटर फिल्टर अशी विविध उपयुक्त उपकरणे सादर केली. वाढत्या ऊर्जेच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी तयार केलेले स्वयंचलित ऊर्जा निर्मिती यंत्र विशेष लक्षवेधी ठरले.प्रमुख पाहुण्यांनी प्रत्येक उपकरणाचे निरीक्षण करून बालवैज्ञानिकांचे कौतुक केले. विज्ञान विभाग प्रमुख सोहेल चव्हाण, नागेश्वर महल्ले, मुस्कान खान मॅडम, गणेश मानतुटे सर, अमृता व्यंजने मॅडम, प्रतिभा पाटील तसेच सर्व वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## संपादकीय

### ध्रुवीकरणातून सत्ताविजय

२०२६ च्या महापालिका निवडणुकांनी महाराष्ट्राच्या शहरी राजकारणात नवे आणि धोकादायक समीकरण उघड केले आहे. भाजपचा अभूतपूर्व विजय आणि त्याचवेळी एआयएमआयएमची वाढ, ज्यातून ध्रुवीकरण आणि मतविभागणीचा खेळ स्पष्टपणे दिसून येतो.

२०२६ च्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्रात २९ महापालिकांच्या २,८६८ जागांचे निकाल आले. भाजप-महायुतीने २५-२६ महापालिकांमध्ये बहुमत मिळवले. एकूण १,८०० जागा जिंकल्या. भाजपने एकट्याने १,४०० जागा जिंकल्या. पण त्यासाठी त्यांनी आपल्या पारंपरिक शत्रूला म्हणजे काँग्रेसला संपवण्यासाठी चक्क ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) या पक्षाला फोफावायला जागा दिली. एआयएमआयएम ही भाजपची बी टीम म्हणून कार्यरत होती की काय अशीच शंका येऊ लागली आणि निकाल आल्यानंतर भाजपने या निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे या सगळ्यांवर मात करण्यासाठी एआयएमआयएमच्या मतांचा खुबीने वापर केला आणि आपल्याच हिंदू मतांना एक आव्हान दिले. भाजपच्या या विजयाने झाला एआयएमआयएम खूश! वल्ला खूश खूश झाला भाजप खूश!! असेच म्हणावे लागेल.

एआयएमआयएमने राज्यभर १२२-१२६ जागा जिंकल्या. छत्रपती संभाजीनगर ३३, मालेगाव २१, नांदेड १५, मुंबई ८, तेही मुख्यतः मुस्लिमबहुल भागात. एआयएमआयएमची वाढ काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पारंपरिक मुस्लिम मतपेढीवर झाली. मुंबईत एआयएमआयएमने काँग्रेसच्या उमेदवारांना थेट हरवले. प्रभाग १३४ मध्ये २,२१६ मतांच्या फरकाने. नांदेडमध्ये काँग्रेस ७३ वरून १० जागांवर आली, एआयएमआयएम १ वरून १५ वर. भाजप मतविभागणीचा खेळ करण्यासाठी एआयएमआयएमचा वापर करत आहे का? असा प्रश्न निवडणूक निकाल पाहिल्यावर पडला आणि बारकाईने त्याचे विश्लेषण केल्यावर हे सहज लक्षात आले की होय, अप्रत्यक्ष भाजपला एआयएमआयएमचा फायदा होतोय, पण हे कटकारस्थान नाही तर ते राजकीय गणित आहे. एआयएमआयएम मुस्लिम मतदारांना पर्यायी आवाज म्हणून आकर्षित करते, ज्यामुळे विरोधकांची मते विभागली जातात. ही मतविभागणी पाहता सहज लक्षात येतेय की, मुस्लिमबहुल प्रभागांमध्ये एआयएमआयएमने काँग्रेस आणि ठाकरे यांची मतं खेचली, ज्यामुळे महायुतीला सोपे विजय मिळाले.

२९ महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये भाजप-नेतृत्वाखालील महायुतीने शत-प्रतिशत जवळपास अपराजेय यश मिळवले. राज्यभरात सुमारे २,८६८ जागांपैकी भाजपने १,४०० जागा जिंकल्या, महायुतीने एकूण १,८०० जागांवर वर्चस्व गाजवले आणि २९ पैकी २५-२६ महापालिकांमध्ये सत्ता मिळवली. मुंबईमध्ये २२७ जागांपैकी महायुतीने ११८ (बहुमत ११४) जिंकल्या. भाजप ८९, शिंदे सेना २९. पुण्यात ११६, पिंपरी-चिंचवडमध्ये ८५, नागपूरमध्ये १०२ जागा. हे फक्त आकडे नाहीत तर हे एका राजकीय यंत्रणेचे पूर्ण वर्चस्व आहे, जे विकासाच्या नावाखाली ध्रुवीकरण आणि मतविभागणीचा कुशल खेळ खेळते. या पार्श्वभूमीवर एआयएमआयएम (ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन) ची वाढ ही एक चिंताजनक घटना आहे. पक्षाने राज्यात १२६ जागा जिंकल्या!!! छत्रपती संभाजीनगरमध्ये ३३ (दुसरा क्रमांक), मालेगावमध्ये २१, नांदेडमध्ये १५, अमरावतीमध्ये १५, मुंबईमध्ये ८. २०१७ च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत फक्त २ जागा असलेल्या एआयएमआयएमने मुस्लिमबहुल भागात काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या पारंपरिक मतपेढीवर जबरदस्त डल्ला मारला. मुंबईत मानखुर्द, गोवंडी, मुंब्रा, कुर्ला येथे एआयएमआयएमच्या उमेदवारांनी काँग्रेसला थेट हरवले. नांदेडमध्ये काँग्रेसचा जुना गड तोडून एआयएमआयएम दुसऱ्या क्रमांकावर पोहोचली. हे यश असदुद्दीन ओवैसी यांच्या आक्रमक प्रचार, घराघरात मोहीम आणि "पर्यायी आवाज" यामुळे मिळाले की ते भाजपच्या अप्रत्यक्ष मदतीने मिळाले? हा खरा प्रश्न आहे. एआयएमआयएमला भाजपची बी-टीम म्हटले जाते आणि हे आरोप निराधार नाहीत. एआयएमआयएम मुख्यतः मुस्लिम मतदारांना एकत्र करून काँग्रेस आणि ठाकरेंची मतं विभागते, ज्याचा थेट फायदा महायुतीला होतो.

# 11 व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात अक्षरोत्सव प्रदर्शन

## रिंगणे येथे 31 जानेवारी व 1 फेब्रुवारीला आयोजन

महाराष्ट्र जीत

**सिंधुदुर्ग ( प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळेरे येथील संदेश पत्र संग्राहक निकेत पावसकर यांच्या अक्षरोत्सव या आगळ्यावेगळ्या संग्रहाचे प्रदर्शन रिंगणे येथे होणाऱ्या 11 व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात आयोजित केले आहे. हे प्रदर्शन 31 जानेवारी व 1 फेब्रुवारी असे दोन दिवस वाचकांना पहायला मिळणार आहे. राजापूर लांजा तालुका नागरिक संघ, मुंबई दरवर्षी हे साहित्य संमेलन आयोजित करते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन उद्योजक विश्वास चव्हाण यांच्या हस्ते 31 जानेवारीला सकाळी 10 वाजता करण्यात येईल. तर या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर असून संमेलन उद्घाटक लालबाग राजा सचिव सुधीर साळवी असून यावेळी आमदार किरण सामंत, लांजा नगराध्यक्ष सावली कुरूप, कोकण मिडियाचे संपादक प्रमोद कोनकर, लेखिका डॉ. विजयालक्ष्मी देवगोजी, शाहू फुले आंबेडकर विचारवंत नामदेव खामकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**यापूर्वी अनेक ठिकाणी प्रदर्शने**

यापूर्वी बेळगाव, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, चिपळूण आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील



विविध माध्यमिक शाळा, वाचनालये आणि इतर कार्यक्रमानिमित्त मिळून 25 प्रदर्शने झाली असून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी विविध मान्यवरांनी या संग्रहाचे कौतुक केले असून विविध ठिकाणी नामवंत व्यक्तींनी प्रदर्शनाला भेटही दिलेली आहे. याशिवाय या अनोख्या संग्रहाबद्दल निकेत पावसकर यांची सह्याद्री वाहिनीसह सिंधुदुर्ग आकाशवाणी केंद्र यावर मुलाखतही प्रसारित झाली आहे.

निकेत पावसकर हे पत्रकार असून कासार्डे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कासार्डे येथे कार्यरत आहेत. त्यांनी गेल्या 20 वर्षात विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ताक्षरातील संदेश पत्रांचा संग्रह करत आहेत. त्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुमारे 2 हजार मान्यवर व्यक्तींची संदेश पत्रे भारतीय पोस्ट कार्डवर घेतलेली आहेत. या संमेलनाच्या निमित्ताने साहित्य, शैक्षणिक, सामाजिक, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ताक्षरातील संदेश पत्रांचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे.

दोन दिवस चालणारे हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत असून विशेषत: शालेय मुलांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन निकेत पावसकर यांनी केले आहे.

**या परदेशी व्यक्तींची पत्रे संग्रहात**

निकेतच्या या संग्रहामध्ये जागतिक किर्तिचा खेळाडू, टेनिसच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडू रॉजर फेडरर (स्वित्झर्लंड), मुहम्मद युनुस (बांग्लादेश), आयर्लंड देशाचे पंतप्रधान-सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सुपुत्र डॉ. लिओ वराडकर, युरोपियन सेन्ट्रल बँकेचे चेअरमन मारिओ ड्राघी (जर्मनी), हॉलीवूड निर्माता अभिनेता दिग्दर्शक सर मायकेल केन (लंडन), अभिनेता जॅकी चेन, अमेरिकन मॉडेल आणि अभिनेत्री कॅरोल अल्ट, मॉडेल-अभिनेत्री-गायिका-नृत्यांगना आणि प्राणीमित्र ब्रिगेट बार्दोत (पॅरीस), वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रिमीयर मार्क मॅकगोवन, सुप्रसिध्द टेनिस खेळाडू स्टेफी ग्राफ, नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अभिजित बॅनर्जी (अमेरिका) या परदेशी व्यक्तींच्या पत्रांचा समावेश आहे.

# रिफ्लेक्टिव टेप लावल्याने अपघात कमी होण्यास मदत

## आरटीओ इन्स्पेक्टर अभिजित कोळी यांचे प्रतिपादन

### माहूर शहरातील सर्व वाहनास लावल्या रिप्लेक्टिव्ह टेप

महाराष्ट्र जीत

**सुभाष खडसे :** तीर्थक्षेत्र माहूर शहर हे पवित्र देवस्थानाचे ठिकाण असल्याने येथे लाखोच्या संख्येने वाहने येतात तर गडावर जाण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात आटो चा वापर करतात त्यामुळे अपघात होऊ नये यासाठी उपाययोजनांचा एक भाग म्हणून पुढील बाजूस पांढरे, बाजूला पिवळे आणि पाठीमागे लाल रिफ्लेक्टर लावणे आवश्यक आहे , रात्रीच्या वेळेस प्रवास करताना या वाहनांवरील रिफ्लेक्टिव टेप रिफ्लेक्ट होतात आणि दुसऱ्या वाहनास अंदाज येऊन अपघाताची शक्यता कमी होते, असे मत आरटीओ इन्स्पेक्टर अभिजित कोळी यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी इन्स्पेक्टर अभिजीत कोळी यांनी गडावरील येणारी जाणारे वाहने सुरक्षित रहावी अपघात होऊ नये यासाठी घाटासह वळणदार रस्त्यावर विविध प्रकारचे बॅनर सूचनाफलक लावून भाविक व नागरिकांचा प्रवास सुरक्षित व्हावा अपघात होऊ



नयेत यासाठी शासन नियमानुसार सर्व उपाययोजना करण्यात येतील असे त्यांनी यावेळी सांगितले नागरिकांनी नियमांचे पालन करावे लहान मुलांना वाहने चालवू देऊ नये तसेच वाहनाची कागदपत्रे इन्शुरन्स बनवून घ्यावीत सुरक्षेसाठी हेल्मेटचा वापर करावा असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला

दि 22 रोजी माहूर शहरातील बाहेरून आलेली सर्व वाहने आणि रिक्षांना रिफ्लेक्टर टेप कश्या प्रकारे लावावे याचे मार्गदर्शन करण्यात आले आणि आणि शेकडो रिक्षांना रिफ्लेक्टिव टेप चिटकविण्यात आले यावेळी इन्स्पेक्टर अभिजीत कोळी इन्स्पेक्टर श्रीमती रेणुका राठोड, आरटीओ इन्स्पेक्टर मंगेश गवारे तसेच वाहन चालक प्रकाश जायभाये

# देगलूर शिव जन्मोत्सव समिति २०२६ जाहीर

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने:** देगलूर येथील दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी शिव स्मारक देगलूर येथे शिव प्रेमींनी १९ फेब्रुवारी २०२६ शिव जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी शिव जन्मोत्सव समिति अध्यक्ष व कार्यकारिणी गठीत करण्यासाठी बैठक आयोजित केली होती .

सर्व शिवप्रेमी यांच्या उपस्थितीत सर्वानुमते २०२६ शिव जन्मोत्सव समिति अध्यक्ष पदी नामदेव पाटील थडके देगावकर यांची निवड झाली . त्या नंतर उपाध्यक्ष पदी गजानन पाटील नागराळकर , ओमकार उल्लेवार , सचिव पदी राजु देशमुख ढोसणीकर , कोषाध्यक्ष पदी डॉ. सुनील जाधव, कार्याध्यक्ष पदी अँड अंकुश राजे जाधव , स्वागत अध्यक्ष पदी खालेद पटेल, संघटक पदी बालाजी पाटील अन्देगाववाडीकर , सहसचिव पदी विशाल पवार , सह कोषाध्यक्ष पदी संजय कांबळे , सह संघटक पदी शेख असलम , प्रसिध्दी प्रमुख पदी राजीव ताटे , मार्गदर्शक :- अँड अंकुश देसाई देगावकर , विठ्ठलराव भोसले , व्यंकट कांबळे , संतोष पाटील येरगीकर , नितेश पाटील ,चंद्रकांत मोरे , अनिल कदम , जनार्दन पाटील बिरादार , दिलीप भडके ,उमाकांत भुताळे .सदस्य पदी दत्ता पाटील केरुरे , शहाजी बाबरे , सुर्यकांत येल्बुगडे , सुनील थडके , गोविंद वट्टमवार , अनिरुद्ध देशमुख , गोविंद पाटील अन्देगावे या प्रमाणे निवड करून कार्यकारिणी गठीत करण्यात आली .

या वेळी शिवस्मारक समिति अध्यक्ष अँड अंकुश देसाई देगावकर , मंगल पाटील २०२५ शिव जन्मोत्सव समिति अध्यक्ष , राजु पाटील मलकापुरकर सचिव २०२५ , नितेश पाटील भोकसखेडकर ,जनार्दन पाटील बिरादार, शशांक पाटील, उमाकांत भुताळे , जयदीप वरखिंडे , जेजेराव पाटील शिंदे ,बालाजी पाटील इब्राहिमपुरकर , गजानन पाटील मुजळगेकर , आकाश वडजे, अत्री पाटील , गोविंदराव केरुरे , पांडुरंग पाटील , पांडुरंग थडके, नवनाथ पाटील, सदाशिव शिंदे, नरेंद्र पाळेकर, दिलीप थडके , संदीप शिंदे , बंटी जाधव सह अनेक शिव प्रेमींच्या उपस्थिती मधे पदाधिकारी निवड संपन्न झाली .


# वर्दडी बु जि. प. सर्कलमधील रस्त्यांच्या प्रश्नाला अखेर वाचा

## प्रदीप बिल्होरे पाटील यांची सार्वजनिक बांधकाम विभागाशी थेट चर्चा

महाराष्ट्र जीत

**सिंदखेड राजा/उमेश एखंडे :** सिंदखेड राजा तालुक्यातील मराठवाड्याच्या सीमेवर असलेल्या वरदडी बु जिल्हा परिषद सर्कलमधील रस्त्यांची दयनीय अवस्था गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांसाठी गंभीर समस्या ठरत होती. रस्त्यांवरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून वाहनधारक, शेतकरी, विद्यार्थी तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अखेर या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात यश आले आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते प्रदीप बिल्होरे पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सचिन वाघ यांची भेट घेऊन वरदडी बु जिल्हा परिषद सर्कलमधील रस्त्यांबाबत थेट



चर्चा केली. नासिराबाद फाटा, सोनोशी मार्गे वरदडी, सावखेड तेजन, चिंचोली तसेच आडगाव राजा मार्गे जाणारे प्रमुख रस्ते पूर्णतः खड्डेमय झाल्याने नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

प्रदीप बिल्होरे पाटील यांनी या सर्व रस्त्यांवरील खड्डे तात्काळ बुजविण्याची ठाम मागणी करत नागरिकांना होणारा त्रास, संभाव्य अपघातांचा धोका आणि प्रशासनाच्या दिरंगाईबाबत स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली.

याची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सचिन वाघ यांनी आठ दिवसांच्या आत वरदडी बु जि. प. सर्कलमधील सर्व खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले जाईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, सावखेड तेजन ते आडगाव राजा हा रस्ता सध्या जिल्हा परिषदेकडे असल्याने त्याची वारंवार दुर्दशा होत आहे, हा मुद्दाही या चर्चेदरम्यान उपस्थित करण्यात आला. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करून अपग्रेड करण्यात यावा, अशी मागणी प्रदीप बिल्होरे पाटील यांनी केली.

यावर प्रशासकीय स्तरावर आवश्यक कार्यवाही करून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे घेण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे उपअभियंता सचिन वाघ यांनी स्पष्ट केले.

# वझरगा येथे स्मशानभूमी उपलब्ध करून द्या

## माणिक सूर्यवंशी यांचे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

महाराष्ट्र जीत

**देगलूर तालुका प्रतिनिधी/संघपाल मदने :** देगलूर तालुक्यापासून अवघ्या दहा किलोमीटर अंतरावर असणारे वझरगा गाव येथे स्मशानभूमी नसल्याने येथे अनेक वर्षापासून समशान भूमीची मागणी होत आहे. त्याच अनुषंगाने भाजपचे पदवीधर देगलूर तालुकाध्यक्ष माणिक बालाजीराव सूर्यवंशी यांनी निवेदनाद्वारे उपजिल्हाधिकारी देगलूर, तहसीलदार देगलूर व गटविकास अधिकारी देगलूर यांना निवेदनाद्वारे तात्काळ समशानभूमी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे..

२१ व्या शतकात मानव मृत्यूनंतर त्याच्यावर अंत्यविधी करण्यासाठी स्मशानभूमी सारखी अत्यावश्यक उपलब्धता नसणे ही फार मोठी शोकांतिका आहे. पूर्वीपासूनच मिळेल त्या ठिकाणी अंत्यविधी करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत होती. मात्र आता वस्ती व लोकसंख्या वाढल्याने प्रत्येक समाजास हक्काची



स्मशानभूमीची अत्यावश्यकता भासत आहे. आज घडीला पारंपारिक पण नोंद नसलेल्या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी सुविधा सुद्धा उपलब्ध नाहीत. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट बनत आहे जेणेकरून केवळ स्मशानभूमी या जागेची उपलब्धता व त्यातील सुविधा न मिळाल्याने वझरगा येतील नागरिकांमध्ये कमालीची नाराजी पसरलेली दिसते वझरगा येथील गावातील लोकसंख्या जवळपास २००० इतकी मोठी आहे. मात्र एवढ्या मोठ्या गावात लोकसंख्या असताना सुद्धा स्मशानभूमी व त्यातील सुविधा उपलब्ध नसणे ही मोठी शोकांतिका आहे. असुविधेचे भांडार असलेल्या जागेमध्ये अंत्यविधी करणे ही मृत्यू नंतरही मानवी जीवनाचे विटंबना होत असल्याचे चित्र निर्माण होत आहे. त्यामुळे प्रशासनाने सदर निवेदनाची तात्काळ दखल घेऊन तात्काळ स्मशानभूमीची उपलब्धता व त्यातील सुविधा ज्यामध्ये आता उपलब्ध असलेल्या असलेली जागा समाजाच्या नावे लावण्याची प्रक्रिया पूर्ण करावी व दफन भूमी कडे जाण्यासाठी रस्ता, बसण्यासाठी जागा, व शेड,विजेचे कामांमध्ये दिवे, संरक्षण भिंत,पाणी, देखभाल व दुरुस्ती या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.अशा स्वरूपाचे निवेदन भारतीय जनता पार्टी पदवीधर देगलूर तालुकाध्यक्ष माणिक बालाजीराव सूर्यवंशी यांनी संबंधित विभागास दिलेली आहेत.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# सोमानी परीवाराचा स्नेहमीलन व हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात



**वाशिम(प्रतिनिधी) :** कुलदैवत बांगडमाता सोमानी परीवाराच्या वतीने बुधवार २१ जानेवारी रोजी रीसोड नाका येथील जुनावाडा सौ.अरूना सुरेश सोमानी यांच्या नीवासस्थानी सोमानी परीवाराचा स्नेहमीलन व राजस्थानी महीलांचा हळदी कुंकु कार्यक्रम उत्साहात पार पडला यावेळी सर्व महिलांना भेट वस्तु देण्यात आली पारंपारीक राजस्थानी वेशभुषा राजस्थानी नृत्य राजस्थानी गीत सादर करण्यात आले.

सोमानी परीवारातील सुन सौ.स्नेहा सोमानी व सौ.राधीका सोमानी यांचे स्वागत श्रीमती पदमादेवी सोमानी, कांताबाई सोमानी,शोभा सोमानी,मीना सोमानी, प्रमीला सोमानी,राजश्री सोमानी,गीता सोमानी, कौशल्या सोमानी,जया सोमानी,योगीता सोमानी,अरूना सोमानी, शोभा सोमानी,अभया सोमानी,रेखा सोमानी,यांच्या मार्गदर्शनात नवीन सुनेचे स्वागत सौ.जोती सोमानी यांच्या हस्ते करण्यात आले. भावी पीढीला संस्कृती व परंपरेची माहीती मीळावी या करीता हा स्नेहमीलन सोहळा आयोजीत करण्यात आला होता.मोठ्यांच्या आर्शीवादाने सोमानी परीवारातील एकात्मतेचे दर्शन घडले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्योती सोमानी, सारीका सोमानी, राधीका सोमानी,शील्पा सोमानी,पुनम सोमानी,श्रद्धा सोमानी,आरती सोमानी,अनीता सोमानी,डॉ सुविधा सोमानी,चंचला सोमानी, मोहीनी सोमानी,सोनम सोमानी, अंकीता सोमानी,निकीता सोमानी, मयुरी सोमानी,दिपा सोमानी,ॲड. भारती सोमानी,ॲड. शितल सोमानी,सुनीता सोमानी,प्रेमा सोमानी,सविता सोमानी,सुजाता राठी ,अर्चना बलदवा ,सपना सोमानी,हेमा सोमानी,नेहा वर्मा आदी सुन व मुलींनी मीळुन हा कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पाडला.

# वांद्रे–उधना विशेष रेल्वे आता दररोज धावणार

## खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्याला यश

**दयानंद शिंदे :** पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्या सातत्यपूर्ण, प्रभावी आणि पाठपुराव्याच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून ०९०५५–५६ वांद्रे–उधना विशेष रेल्वे सेवा आता दैनिक (दररोज) स्वरूपात उपलब्ध होणार आहे.

यापूर्वी ही रेल्वे आठवड्यातून केवळ पाच दिवस धावत असल्यामुळे गुरुवार व शुक्रवार या दोन दिवस प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत होती. विशेषतः बोर्डी रोड, घोलवड, डहाणू रोड, वाणगाव, केळवे रोड, उमरोली, सफाळे व वैतरणा या स्थानकांवरील कर्मचारी, कामगार, व्यापारी, विद्यार्थी तसेच दैनंदिन अप-डाऊन करणाऱ्या प्रवाशांना सुरक्षितता व प्रवासाच्या दृष्टीने मोठा त्रास सहन करावा लागत होता.



ही गंभीर बाब लक्षात घेऊन मा. खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी १३ जानेवारी २०२५ पासून सातत्याने रेल्वे प्रशासन व माननीय केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पाठपुरावा केला. तसेच हा विषय संसदेत प्रभावीपणे मांडण्यात आला. दिनांक २१.०१.२०२६ रोजी DRM मुंबई यांच्याकडेही हा प्रश्न ठोसपणे मांडण्यात आला होता.

या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आता गुरुवार व शुक्रवार या दिवसांसाठी नवीन विशेष रेल्वे गाड्या घोषित करण्यात आल्या असून त्यामुळे वांद्रे–उधना मार्गावरील रेल्वे सेवा प्रत्यक्षात दैनिक झाली आहे.

विद्यमान रेल्वे सेवा:

०९०५५ – वांद्रे ते उधना (रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार)

०९०५६ – उधना ते वांद्रे (शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार)

नवीन घोषित रेल्वे सेवा:

०९०३५ – वांद्रे ते उधना (शुक्रवार, शनिवार)

०९०३६ – उधना ते वांद्रे (गुरुवार, शुक्रवार)

या नव्या गाड्यांमुळे विरार ते वलसाड दरम्यान प्रवास करणाऱ्या असंख्य कर्मचारी, कामगार, व्यापारी व विद्यार्थी वर्गामध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

याचबरोबर, सुट्टी विशेष तसेच नव्याने सुरू होणाऱ्या रेल्वे गाड्यांना पालघर जिल्ह्यातील स्थानकांवर थांबे देण्यात यावेत, अशी मागणीही खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री व पश्चिम रेल्वे प्रशासनाकडे केली होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत वांद्रे–भिवाणी सुट्टी विशेष रेल्वे गाडीला पालघर स्थानकात थांबा मंजूर करण्यात आला आहे.

तसेच डहाणू उपनगरीय रेल्वे सेवा अधिक सक्षम व विस्तारित करण्यासाठी खासदार डॉ. हेमंत सवरा यांचे प्रयत्न सातत्याने सुरू असून भविष्यात प्रवाशांच्या सोयीसाठी आणखी महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# कामोठे येथे राजमाता जिजाऊ जयंती साजरी; शौर्य प्रात्यक्षिक आणि गुणवंताचा सत्कार

**अविनाश जाधव वार्ताहर/ कळंबोली प्रतिनिधी: -** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी कामोठा येथे राजमाता जिजाऊ उत्सव समितीच्या वतीने 12 जानेवारी रोजी जिजाऊ मा साहेबांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये भव्य दिव्य व नेत्र दीपक वातावरणामध्ये रॅली काढून व विविध शौर्य प्रात्यक्षिके व गुणवंताचा सत्कार करून साजरी करण्यात आली.




राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त जिजाऊ लाटे काटेपतकाकडून लाठीकाठी व तलवारबाजी ची अविस्मरणीय अशी प्रत्यक्ष के सादर करण्यात आली. या पथकाचा सन्मान स्वराज्याचे शिलेदार देशाची कंक यांचे वंशज सिद्धार्थ दादा कंक हे यांच्या हस्ते करण्यात आला.

समितीतर्फे जयंतीनिमित्त चित्रकला रांगोळी स्पर्धा मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला तसेच दीपा खरात यांनी "पोरी जरा जपून' या विषयावर नाट्यप्रयोग सादर करण्यात आला त्यामुळे नव्या पिढीतील युवक युवतींना महत्त्वाचा सामाजिक संदेश दिला कार्यक्रमात सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा जिजाऊ ची प्रतिष्ठा देऊन सन्मान करण्यात आला महिलांसाठी पैठणी हा खेळ कुपन काढून जिजाऊंच्या लेकींचा सन्मान करण्यात आला.

राजमाता जिजाऊ उत्सव समितीचे सर्वेसर्वा दशरथ पाटील यांनी लेखन केलेले 'चला स्वप्नांच्या दुनियेत जाऊया' या पुस्तकाचे अनावरण स्वराज्य शिलेदार यांचे वंशज सिद्धार्थ दादा कंक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैभव खरात यांचे राजमाता जिजाऊंच्या जीवन चरित्रावर आधारित ऐतिहासिक महाराष्ट्राचा पोवाडा सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला स्वराज्याचे शिलेदार बादल घराण्याचे वंशज हरिश्चंद्र बादल यांचीही उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवणारी ठरली.

राजमाता जिजाऊ उत्सव समिती यांच्यातर्फे विविध कार्यक्रम व कराटे यांचे प्रात्यक्षिक तसेच लाठीकाठी चे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.

या सोहळ्यास कामोठे कळंबोली येथील अनेक सामाजिक राजकीय व व्यावसायिक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती . या जिजाऊ जयंती निमित्त नागरिकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला आहे. या कार्यक्रमाचे पनवेल तालुक्यातून विशेष असे कौतुक होत आहे.

# केकतउमरा येथील चेतन सेवांकुर मधील दिव्यांग बांधवांना रेडिओचे वितरण

**वाशिम(प्रतिनिधी) :** सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या चेतन सेवांकुर दिव्यांग आश्रमाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही चाळीस दिव्यांग बांधवांना रेडिओचे वितरण ग्रामगीताचार्य शुकदास गाडेकर दादा यांच्या हस्ते करण्यात आले .



यावेळी ज्येष्ठ समाजसेवक माधवराव मारशेटवार गुरुजी, उद्योजक देवेंद्र खडसे पाटील उद्योजक मिलिंद भावसार माजी आमदार गुलाबचंद् राठी, तरुण क्रांती मंच जिल्हाध्यक्ष निलेश सोमाणी, डॉक्टर संजय तोष्णीवाल, पांडुरंग उचितकर, प्रकाशचंद गोधा, जितेंद्र गोधा, शिखरचंद बागरेच्या, शिवलाल भुतडा, सुनील गट्टानी , ॲड.सौ.भारती सोमानी , सौ. परतानी, सौ .शुभदा चरखा, प्रविण पट्टेबहादुर उपस्थित होते.

ग्रामगीताचार्य शुकदास गाडेकर दादा यांनी चेतन सेवांकुर ग्रुपने समाजाला दृष्टी देण्याचे काम केले आहे स्वतः दिव्यांग असतानाही त्यांनी संघर्ष करून आत्मनिर्भर द्वारा आपल्या मिळकतीतून आर्केस्ट्राच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध केला आहे समाजाने व प्रत्येक घटकांनी यांचा आदर्श घ्यावा असे आव्हान केले, यावेळी बाजी आमदार गुलाबचंद राठी यांनी गुलाबचंद यांनी चेतन सेवांकुर ला पाच हजार एक रुपयाची देणगी दिली.

सदर रेडिओ करिता उद्योजक दिलीप केसवाणी यांचे सहकार्य लाभले.

# जऊळका रेल्वे येथे मका उत्पादन व काढणी पश्चात तंत्रज्ञानावर प्रशिक्षण व चर्चासत्र संपन्न

**वाशिम(प्रतिनिधी) :** भारतीय कृषी अनुसंधान परिषद,नवी दिल्ली पुरस्कुत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने दिनांक 22 जानेवारी 2026 रोजी जऊळका रेल्वे येथील श्री. हरिदास ढोके यांच्या शेतामध्ये मका उत्पादन व काढणी पश्चात तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. हरिदास गोविंदा ढोके होते. प्रमुख मार्गदर्शक वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम – डॉ. आर. एल. काळे, तसेच अर्थशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर इंगोले, पशु विज्ञान तज्ञ श्री. मयूर देशमुख व कृषी विभागाचे कृषी सहाय्यक श्री. आंधळे हे होते. प्रास्ताविकात डॉ. दिगंबर इंगोले यांनी कार्यक्रमाची उद्दिष्टे व रूपरेषा स्पष्ट केली. जऊळका रेल्वे परिसरात सुमारे 100 हेक्टर क्षेत्रावर बिजोत्पादनासाठी मक्याची लागवड झालेली असून, उत्पादन तंत्रज्ञानासोबतच काढणी पश्चात तंत्रज्ञान या बाबतीत शेतकऱ्यांची वाढती गरज लक्षात घेऊन कृषी विज्ञान केंद्रामार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच यावेळी त्यांनी यांनी 'जी-राम-जी विधेयक' अंतर्गत शेतकऱ्यांचे



हक्क, संधी व दीर्घकालीन लाभ यांची माहिती दिली. तांत्रिक मार्गदर्शन करताना डॉ. रविंद्र काळे यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध तंत्रविस्तार उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादनवाढ साध्य करताना शेती कमी खर्चिक, शाश्वत व उद्योगाभिमुख बनवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शेतमाल मूल्यवर्धनावर आधारित प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO) व कृषी उद्योजकता विकास यांच्या माध्यमातून शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन व्यावसायिक दृष्टिकोनातून उत्पादन घेण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. श्री. मयूर देशमुख यांनी मक्याची कुट्टी करून सायलेज निर्मितीची शास्त्रीय पद्धत, योग्य ओलावा नियंत्रण, साठवणूक तंत्र व पोषणमूल्य वाढविण्याचे उपाय स्पष्ट केले. हिवाळी काळात जनावरांना कोरडा-ओला संतुलित चारा, स्वच्छ पाणी, निवाऱ्यात उबदार व्यवस्था तसेच रोगप्रतिबंधक लसीकरण यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. या तंत्रज्ञानामुळे वर्षभर दर्जेदार चारा उपलब्ध होऊन दूध उत्पादनात वाढ व खर्चात बचत साध्य होईल, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात श्री. हरिदास ढोके यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत उपलब्ध तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांनी प्रभावीपणे वापर करून कृषी विकास साधावा, तसेच शेतीपूरक उद्योग व जोडधंदे उभारून शेतीतील खर्च कमी करण्याचे आवाहन केले. श्री.आंधळे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत, तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीला उद्योगाचे स्वरूप देण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जऊळका रेल्वे शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व संचालक व सभासद यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता अधिक परिश्रम घेतले तसेच मैराडोह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अंकुश पोदाडे, सागर बळी व अमोल बळी यांच्या मका पिकाची पाहणी करून तांत्रिक चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र भिकाजी सुळके तर आभार प्रदर्शन श्री दत्ता काळे यांनी केले.

# वाशिम येथे वंचित बहुजन आघाडीची बैठक उत्साहात संपन्न; बैठकीत विविध विषयावर चर्चा

**वाशीम(प्रतिनिधी) :** येथील शासकीय विश्रामगृहात वंचित बहुजन आघाडीची आढावा,जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक रणनीतीची आखणी करण्यासाठी बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्ष जिल्हाचे महासचिव प्रा.रंगनाथ धांडे होते तर मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्हाचे निरीक्षक नतिकोद्दीन खतीब साहेब व फुले आंबेडकर विद्वत सभेचे अध्यक्ष भास्कर भोजने सर होते



या सभेला प्रदेश सदस्या किरणताई गिऱ्हे, वाशीम-मंगरूळपीर विधान सभा अध्यक्ष डॉ.तुषार गायकवाड , महिला आघाडीच्या अध्यक्ष ज्योतीताई इंगळे,माजी महासचिव सोनाजी इंगळे,प्रवक्ते संदिप सावळे यांची उपस्थिती होती.सर्व प्रथम वाशीम तालुकाध्यक्ष दिलीप भगत, रिसोड तालुकाध्यक्ष महेश तिडके,मालेगाव तालुकाध्यक्ष सारनाथ अवचार,मंगरूळपीर तालुकाध्यक्ष नरेंद्र राऊत, कारंजा तालुकाध्यक्ष भारत भगत, मानोरा तालुकाध्यक्ष विनोद राठोड यांनी नगर परिषद, नगर पंचायत निवडणूक आढावा सादर केला.त्यानंतर सूर्यकांत गायकवाड, संतोष सरकटे,विनोद भगत आरती ठोके,सोनाजी इंगळे,डॉ.तुषार गायकवाड, ज्योतीताई इंगळे,किरणताई गिऱ्हे,भास्कर भोजने सर,प्रा.रंगनाथ धांडे व माजी आमदार नतीकउद्दीन खतीब साहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.भास्कर भोजने सर यांनी पक्षाचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कार्य आपल्या शैलीतून स्पष्ट केले.

खतीब साहेब यांनी आगामी निवडणुकीत आपली रणनिती व संघटनात्मक बांधणीसाठी प्रक्रिया लवकरच पार पडणार असून आगामी निवडणुका ताकदीने लढविणार असा विश्वास व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात प्रा.रंगनाथ धांडे यांनी मागील निवडणुकीतून काही धडा शिकवून त्यावर उपाय सांगीतला. येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका ताकतीने लढविणार अशी एकमुखी संकल्प केला.

या बैठकीला विनोद भगत, सुरेश सोनोने,समाधान भगत, बाळासाहेब खंडारे,नारायण मिटकरी,वसंतराव राठोड, दिवाकर चक्रनारायण,शंकर दादा तायडे,सुनील गायकवाड, नंदू वानखेडे, अरुण बोरकर, अनिल देशमुख, अरुण ठाकरे,गोविंद वर्मा, राजू जमधाडे,समाधान गवई, दिनेश खडसे,बबन पडघाण, कैलास भगत,अमोल पखाले, प्रमोद कंकाळ,राहुल कांबळे,मुकुंद खडसे,उध्दव चव्हाण, राजाभाऊ चव्हाण, गोपाल मनवर,भगवान भगत, सुधीर गहूले,सुनिल वानखेडे,अनंत जुमडे,वासुदेव कांबळे,संजय खडसे,अरुण ठाकरे,रविकुमार देवढे, अनिल देशमुख, महेश तायडे ,स्वप्नील खडसे आदीं कार्यकर्त उपस्थित होते.या सभेचे संचालन संदिप सावळे यांनी तर आभार विनोद भगत यांनी मानले.

# चेतन सेवांकुर ग्रुप समाजासाठी आदर्श - आ. शाम खोडे

## कै.गयाबाई उचितकर कृतज्ञता पुरस्काराचे वितरण

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** येथून जवळच असलेल्या ग्राम केकत उमरा येथील चेतन सेवांकुर दिव्यांग आश्रम येथे विविध सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना कै. गयाबाई उचितकर कृतज्ञता पुरस्काराने ग्रामगीताचार्य ह भ प . शुकदास उद्धवराव गाडेकर दादा व वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह सन्मानपत्र शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मंचावर , ग्रामगीता प्रचारक शुकदास उद्धवराव गाडेकर महाराज , ज्येष्ठ समाजसेवक माधवराव मारशेटवार गुरुजी, जिंतूर चे माजी आमदार गुलाबचंद राठी,उद्योजक देवेंद्र खडसे पाटील, मिलिंद भावसार, सामाजिक कार्यकर्ते तरुण क्रांती मंच जिल्हाध्यक्ष निलेश सोमानी, डॉ. संजय तोष्णीवाल, माहेश्वरी संघटनेचे प्रदेश संयुक्त मंत्री शिवलाल भुतडा, डॉक्टर संजय तोष्णीवाल, प्रकाशचंद गोधा, जितेंद्र गोधा, भारतीय जैन संघटनेचे शिखरचंद बागरेचा, सुनील गट्टानी, कृष्णा चरखा, भाजपा शहर अध्यक्ष मनीष मंत्री, सब रजिस्टर स्नेहल सरनाईक, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग उचितकर हरीश जाखेटे, नारायणराव काळबांडे, डॉ. हरीश बाहेती उपस्थित होते. सर्वप्रथम दीप प्रजलवन व कुंडीतील झाडांना पाणी टाकून पूजन करण्यात आले तदनंतर समाजसेवी ॲड. संतोष राठी



गौरव चरखा ,राजवीरसिंग कपूर निलेश सोमाणी डॉ. संजय तोष्णीवाल,हरीश जाखोटेडॉ. हरीश बाहेती,डॉ .राहुल महाले,डॉ. जीवन नायक,दिलीप केशवानी,जितेंद्र गोधा,प्रकाशचंद गोधा,अनिल केंदळे नगराध्यक्ष मिलिंद भावसार,अरुण वासुदेव राऊत,तरणसिंग सेठी, कृष्णा चरखा,मोहन दाभाडे,धर्मराज चव्हाण,नितीन व्यवहारे,देवेंद्र खडसे पाटील,श्रीमती शीलाताई राठी,अध्यक्षा वाशिम अर्बन बँक ,सुनील गट्टानी,श्रीराम राठी,मोहित कर्नावट,शिवलाल भुतडा,ॲड.सौ.भारती सोमाणी,पुरुषोत्तम परतानी,नारायणराव काळबांडे,मनीष मंत्री,सौ.दीपाली तात्याराव पट्टेबहाद्दुर, सरपंच केकतउमरा, उपसरपंच नागनाथ वाठ,सुनील जनार्दन दिग्रस्कर,रितेश कान्हेड शिखरचंद बागरेचा,दीपक पायघन,दत्तरा गोटे.प्रवीण पट्टेबहाद्दुर,महेंद्र दागडिया,विनोद सरनाईक कु. स्नेहल विनोद सरनाईक,दिनकर सुरोशे, तुकाराम वाशिमकर, संगीता आहाळे,उद्योजक दिलीप हेडा, भूषण कुरेकर, प्रभाकर लहाने, श्याम नेणवाणी, श्रीराम हजारे, राजेश पट्टेबहादूर ,किशोर आरु, आदी मान्यवरांना गयाबाई उचितकर कृतज्ञता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी चेतन सेवांकुर आर्केस्ट्रा ने सुंदर भावगीते भक्ती गीते व आई-वडिलावर आधारित गीते सादर केली. उद्योजक मिलिंद भावसार व देवेंद्र खडसे पाटील यांनीही गीत सादर करून उपस्थितांना जिंकले. आमदार शाम खोडे यांनी चेतन सेवांकुर ग्रुप समाजासाठी आदर्श असून त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासित केले. ग्रामगीताचार्य शुकदास गाडेकर दादा यांनी ग्रामगीतेवर माहिती देऊन जीवनाचा कल्ला होऊ नये म्हणून जीवनात कोणतीतरी कला जरुरी असल्याचे सांगितले, देव बाजारचा भाजीपाला नाही तो माणसातच असल्याचे त्यांनी विविध दाखल्यासह उदाहरणे देऊन स्पष्ट केले. आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा असून पांडुरंग विठ्ठल हे त्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले भक्त पुंडलिकच्या साठी पांडुरंगाने दर्शन दिले. पुंडलिकाने आई-वडिलांची सेवा केली त्यामुळेच पांडुरंग विटेवर उभे झाले असे सांगितले. सदर कार्यक्रमात उचितकर दांपत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पांडुरंग उचितकर, संचालन नारायणराव काळबांडे तर आभार शिखरचंद बागरेच्या यांनी मानले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# स्क्रोलिंग' थांबलं, इतिहास जागा झाला !

## गाणं, डॉक्युमेंटरी आणि डिजिटल युगातील संस्कार क्रांती

सध्याच्या 'फास्ट फूड', 'इन्स्टा रिल्स'च्या युगात एखादा ट्रेंड किती काळ टिकतो ? फार तर २४ तास! पण, याच डिजिटल जगात ४०० वर्षे जुन्या इतिहासाने आजच्या 'जनरेशन झी'ला (Gen Z) चक्क थांबायला भाग पाडले. निमित्त, सुप्रसिद्ध सुफी गायक डॉ. सतींदर सरताज यांच्या आवाजातील 'हिंद की चादर' या कलाकृतीचे.

नांदेडच्या पवित्र मातीत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा ३५० व्या भव्य शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम होत आहे. महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समितीच्या सहकार्याने निर्वैर निर्मित 'हिंद की चादर' डॉक्युमेंटरी (माहितीपट), अन् सरताज यांचे गीत आता केवळ व्हायरल कंटेंट उरला नसून, ती एक 'संस्कारांची डिजिटल चळवळ' बनली आहे.

**सुरांचा जादूगर : कोण आहेत सतींदर सरताज ?**

या चळवळीचा चेहरा आणि आवाज आहेत, डॉ. सतींदर सरताज. मूळचे पंजाबचे. सरताज केवळ गायक नाहीत, तर सुफी संगीतातील 'डॉक्टरेट' (Ph.D) आहेत. त्यांच्या गळ्यातून जेव्हा "सीस लेकर उसी ओर चल दिए..." हे शब्द उमटतात, तेव्हा त्यात केवळ संगीत नसते, तर १७ व्या शतकातील वेदना आणि त्यागाचा हुंकार असतो. त्यांच्या याच भारदस्त आवाजामुळे तरुणाई पॉप गाणी सोडून इतिहासाकडे वळली आहे.

**व्हायरल 'सत्य': अल्गोरिदमलाही फुटल्या भावना!**

आकडेवारीवर नजर टाकली तर थक्क व्हायला होते. २५ ऑक्टोबर २०२५ ला प्रदर्शित झालेल्या 'हिंद की चादर' या गाण्याने युट्युबवर अल्पावधीतच २.७६ कोटी (2.76 Crore+) व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. तर १.८३ लाखांहून अधिक लाईक्स असे सिद्ध करतात, की हे गीत लोकांनी फक्त ऐकले नाही, तर अनुभवले आहे.

केवळ युट्युबच नाही, तर इन्स्टाग्रामवरही (Instagram) या गाण्याची लाट आली आहे. विशेषतः "सीस लेकर उसी ओर चल दिए" या ओळींवर तरुणाईने बनवलेले हजारो 'रिल्स' (Reels) सध्या सोशल मीडियावर इमोशनल ट्रेंड बनले आहेत.

दुसरीकडे, निर्वैर प्रॉडक्शन (Nirvair Productions) निर्मित १६ मिनिटांच्या डॉक्युमेंटरीला मिळालेले ४६ लाख (46 Lakhs+) व्ह्यूज हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत की, चांगल्या कंटेंटला 'अल्गोरिदम'ची गरज नसते, त्याला 'भावनांचा' आधार असतो.

**पुस्तकातील धडा 'मोठ्या पडद्यावर'**

शाळांमध्ये इतिहास शिकवला जातो, पण तो पडद्यावर 'दाखवला' तर ? महाराष्ट्र शासनाने नेमका हाच धागा पकडला आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये एक आगळावेगळा राबवत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी (गुरूजी) यांच्या जीवन, शिक्षण आणि सर्वोच्च बलिदानावर आधारित माहितीपट दाखवण्यात येत आहे. या माहितीपटात VFX आणि ॲनिमेशनचा वापर करून जुन्या काळातील 'सेपिया' आणि 'गोल्डन' टोन उभा केला आहे.

राज्यातील शाळांमधून गुरुजींचा इतिहास विद्यार्थी मोठ्या पडद्यावर पाहत आहेत. या इतिहासातून ते प्रेरणा घेत आहेत. इतिहास समजून घेत आहेत. जेव्हा विद्यार्थी पडद्यावर पाहतात, की गुरुजींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी भाई लखी शाह बंजारा चक्क स्वतःचे घर जाळून टाकतात, तेव्हा वर्गातली शांतता खूप काही सांगून जाते. जे संस्कार शंभर व्याख्यानांतून करणे अवघड आहे, ते या माहितीपटातून होण्यास मदत होते.

**महानायकांना सलाम**

हा माहितीपट, गीत इतिहास जिवंत करते. अशा महानायकांना सलाम करते. हा सर्व इतिहास पुस्तकातून आता थेट लोकांच्या काळजात कोरल्या जात आहे.

भाई मखन शाह लबाना : ज्यांनी समुद्राच्या तुफानातून वाचल्यावर 'खऱ्या गुरूंचा' शोध लावला.

भाई लखी शाह बंजारा: दिल्लीच्या चांदनी चौकात मुघलांच्या नाकावर टिच्चून ज्यांनी "घरदार जळाले तरी चालेल, पण गुरुजींची शान राहिली पाहिजे," हा बाणा जपला

भाई जैता जी : गुरुजींचे पवित्र शीर (मस्तक) सांभाळून, अतिशय कठीण प्रवासाने आनंदपूर साहिबला आणले व गुरू तेगबहादुर जी यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह जी यांच्याकडे सुपूर्द केले.

नांदेड : विश्वासाचे केंद्र

या साऱ्याचा केंद्रबिंदू आहे— नांदेड. गोदावरीच्या काठावर वसलेले शहर. हे केवळ शहर नसून एक मोठे पवित्र तीर्थस्थान आहे. हे पवित्र स्थळ शीख धर्मातील पाच तख्तांपैकी एक आहे. येथे हजूर साहिब गुरूद्वारा, ज्याला तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब म्हणून ओळखले जाते. दहावे गुरू गुरू गोविंद सिंह यांचे अंतिम विश्रांतीस्थान आहे. श्री गुरू गोविंद सिंहांचे वास्तव्य या भूमीस लाभले. त्याचबरोबर गुरू गोविंद सिंहांनी त्यांच्यानंतर पवित्र ग्रंथालाच शाश्वत गुरू म्हणून घोषित केले. शीख धर्माचे अकरावे आणि अंतिम गुरू पवित्र गुरू ग्रंथ साहिब याच ठिकाणी आहेत. त्यामुळे या पवित्र भूमीत होत असलेल्या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी ३५० शहीदी आणि श्री गोविंद साहिब जी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमाकडे संपूर्ण जग पाहत आहे.

शाळेतील मुलांच्या प्रभात फेऱ्या असोत किंवा राज्यातील सिनेमागृहात चित्रपटाच्या सुरूवातीला दाखवले जाणारे गुरूजींच्या जीवनावर आधारित गीत, माहितीपट असो; प्रत्येक ठिकाणाहून गुरूजींचे जीवन, शिकवण आणि त्यांचे सर्वोच्च बलिदान हा संदेश दिला जात आहे. सरताज यांनी गायलेले गीत, गुरूजींवर आधारित माहितीपट ३५० वर्षांपूर्वीच्या प्रेरक इतिहासाचा आजच्या भाषेतला 'दस्तावेज' (Document) आहे. औरंगजेबाच्या तलवारीपेक्षा गुरुजींचा शांततेचा आणि त्यागाचा मार्ग किती शक्तिशाली होता, हे समजून घेण्यासाठी एकदा तरी ही कलाकृती सर्वांनी पाहायलाच हवी !

गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शहीदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भारतभर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होत आहेत. परंतु नांदेड येथे होत असलेल्या या कार्यक्रमास विशेष असे महत्त्व आहे. या होत असलेल्या भव्य दिव्य अशा श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी आणि श्री गोविंद साहिबजी 350 व्या गुरतागद्दी शताब्दी कार्यक्रमास उपस्थित राहून, प्रत्येकाने इतिहासाचे साक्षीदार देखील व्हायलाच हवे.

पाहायला हवंच :

- गीत (Song) :
- माहितीपट (Documentary)

महाराष्ट्र जीत

**डॉ. श्याम टरके**

# श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...



महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.

आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला – बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला.

शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.

श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते – मी शीख आहे आणि शीखच राहणार!

श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे -"आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे." त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

महाराष्ट्र जीत

**अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष निनादणार

## गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' चित्ररथ सज्ज

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त राजधानीतील कर्तव्यपथावर होणाऱ्या भव्य पथसंचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ सज्ज झाला असून, यंदा राज्याच्या वतीने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर यंदाचा सोहळा विशेष ठरणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा



उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत संचलनात सहभागी होणारा महाराष्ट्राचा हा चित्ररथ राज्याची प्रदीर्घ परंपरा आणि वाढत्या आर्थिक सामर्थ्याचे दर्शन अवघ्या जगाला घडवेल.

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तिच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण या चित्ररथात करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५ पासून सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली असून, या उत्सवामुळे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर पर्यावरणीय आणि आर्थिक आत्मनिर्भरतेसही कशी चालना मिळते, हे या चित्ररथातून ठळकपणे मांडण्यात आले आहे.

**कसा असेल चित्ररथ?**

महाराष्ट्राच्या या चित्ररथाची रचना अत्यंत कलात्मक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. चित्ररथाच्या अग्रभागी महाराष्ट्राच्या ऊर्जेचे प्रतीक असलेला एक भव्य ढोल आणि तो वाजवणारी पारंपारिक वेशभूषेतील महिला राज्याच्या प्रबळ स्त्रीशक्तीचे दर्शन घडवेल. चित्ररथाच्या मध्यभागात गणपतीची देखणी मूर्ती साकारणारा मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेला गणेशभक्त दर्शवण्यात आला आहे. चित्ररथाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, इतर सांस्कृतिक बाबींचेही बारकाव्यांसह दर्शन घडवण्यात आले आहे. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस पारंपारिक नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांचे लेझीम पथक असेल.

यंदाचा हा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर आयोजित होणाऱ्या 'भारत पर्व'मध्ये देखील देशवासियांना महाराष्ट्राच्या या सांस्कृतिक समृद्धीचा आणि आत्मनिर्भरतेच्या प्रवासाचा आनंद घेता येणार आहे.